# महाराष्ट्र शासन

क्र. आयडीसी २०२०/ प्र.क्र १८९/ उ.१४
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
email:- kiran.jadhav79@nic.in
फोन- ०२२-२२०४४२१२.
दिनांक :- ११ मे, २०२०.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
अंधेरी (पू.), मुंबई- ९३.

**विषय :- मा. प्रधान सचिव (उद्योग) तथा अध्यक्ष उच्चाधिकार समिती यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची १२३ व्या बैठकीचे इतिवृत्त. (भूसंपादन)**

संदर्भ :- दि. १४/०३/२०२० रोजी झालेल्या १२३ व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

मा. प्रधान सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची दि. १३/०३/२०२० रोजी सांय. ०५:०० वाजता १२३ वी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीचे इतिवृत्त महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संदर्भाधीन दि. १४/०३/२०२० च्या टिप्पणीन्वये मान्यतेसाठी सादर केले आहे. सदर इतिवृत्तास मा. प्रधान सचिव (उद्योग) तथा अध्यक्ष, उच्चाधिकार समिती यांनी मान्यता दिली आहे. त्याची प्रत पत्रासोबत जोडून पाठवित आहे.

तरी, इतिवृत्ताच्या अनुषंगाने महामंडळाने आवश्यक कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,

o/c (किरण जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**सोबत :-** वरीलप्रमाणे.

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१. मा. प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहायक.
२. उप सचिव (डॉ. भोसले) यांचे स्वीय सहायक.
३. निवडनस्ती (उद्योग-१४).

मा. प्रधान सचिव (उद्योग) तथा अध्यक्ष, उच्चाधिकार समिती यांचे मंत्रालयीन दालनात दि. १३/०३/२०२० रोजी सांय ५.०० वा. झालेल्या १२३ व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

| अ.क्र. | विषय | म.औ.वि. महामंडळाचे अभिप्राय | अध्यक्षांचे निर्देश |
|---|---|---|---|
| १. | दिनांक २४/०१/२०२० रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीच्या १२१ बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी देण्यात आली. | इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | मान्य |
| २. | **प्रलंबित भूसंपादना संदर्भातील प्रकरणांचा आढावा.** | मा. उच्चाधिकार समितीने प्रलंबित भूसंपादन प्रकरणी तत्परतेने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. | मान्य |
| ३. | **विस्तारीत शहापूर धेरंड औद्योगिक क्षेत्र.**<br>मौजे शहापूर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील ७३६.३९४ हे.आर खाजगी क्षेत्रासाठी मुल्यांकनाचा दर निश्चित करणेबाबत. | सदर विषयावर उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती मा. उच्चाधिकार समितीने मौजे शहापूर धेरंड क्षेत्रासाठी LAR अधिनियम, २०१३ नुसार प्रस्तावित संपादनातील जमिनीच्या संबंधातील नुकसान भरपाईचे मुल्य सन २०१६-२०१९ चा खरेदी विक्री व्यवहाराच्या सुचीनुसार जमिनीचे प्रती हेक्टरी मुल्यांक दर रु. ३२,७७,७३४/- इतका येत आहे.<br>सदर दरामध्ये १.५ गुणक व १००% दिलासा रक्कम मिळून प्रति हेक्टरी रु. ९८,३३,२०२/- येत आहे. परंतू, औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांना परवडणारा भूखंड विक्रीचा दर विचारात घेता रक्कम रु. ८७,५०,०००/- प्रति हेक्टरी दरानुसार भूखंड विक्रीचा दर प्रति चौ.मी. ३३५६/- येईल.<br>वरील सर्व बाबींचा विचार विनिमय करुन प्रति हेक्टरी रु. ८७,५०,०००/- दराप्रमाणे वाटाघाटी करण्यासाठी जिल्हाधिकारी, रायगड यांना कळविण्याचे निर्देश मा. उच्चाधिकार समितीने दिले. | मान्य |
| ४. | **मौजे जांभिवली, ता. अंबरनाथ येथील एकूण क्षेत्र ५०.७९.६० हे.आर क्षेत्र कलम १५ (ब) अन्वये खरेदी करणेसाठी हेक्टरी दर निश्चितीबाबत.** | सदर विषयावर उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करणेत आली. चर्चेअंती मा. उच्चाधिकार समितीने मौजे जांभिवली येथील एकूण क्षेत्र ५०.७९.६० हे.आर | मान्य |

C:\Udyog-१४ २०१९\Udyog १४\High Power Meeting\CR १८९ High power १२३.docx

| अ.क्र. | विषय | म.औ.वि. महामंडळाचे अभिप्राय | अध्यक्षांचे निर्देश |
|---|---|---|---|
| | | क्षेत्र कलम १५ (ब) अन्वये खरेदी करणेसाठी मा. संचालक मंडळाने संमती दिलेली आहे. त्याअनुषंगाने सदर क्षेत्रासाठी भूसंपादनाचा दर निश्चित करणेचे दृष्टीने अति. अंबरनाथ औद्योगिक क्षेत्राकरीता सध्याच्या प्रचलित औद्योगिक भूखंड वाटपाचा दर रु. ४,४००/- प्रति चौ.मी. विचारात घेता, रु. १.५३ कोटी प्रति हेक्टरी दर येत असल्याचे निदर्शनास आणून दिले.<br>तथापि, सन २०१६ मध्ये अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रामध्ये निविदा पध्दतीने औद्योगिक भूखंड वाटप करताना निविदेव्दारे आलेला उच्चतम दर रु. ६,१५०/- प्रति चौ.मी. एवढा होता. सद्यःस्थितीत अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रामध्ये निविदापध्दतीने औद्योगिक भूखंड वाटप करताना निविदेव्दारे आलेला उच्चतम दर रु. १५,०००/- प्रति चौ.मी. एवढा प्राप्त झाला आहे.<br>सबब रु. १५,०००/- प्रति चौ.मी. दर हा एखाद्या भूखंडासाठी आला असल्यामुळे त्याचा विचार करता येणार नाही अशी चर्चा झाली.<br>सन २०१६ झाली प्राप्त दराप्रमाणे भूखंड विक्री होऊ शकेल. मा. संचालक मंडळाने निश्चित केलेल्या Template मध्ये reverse calculation केल्यावर प्रति हेक्टर २.३३ कोटी दर देणे किफायशीर राहील, अशी चर्चा झाली.<br>उपरोक्त प्रमाणे मौजे जांभिवली, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील प्रस्तावित कलम १५ (ब) व्दारे खरेदी करावयाच्या जमिनीसाठी प्रति हेक्टरी २.३३ कोटी दरास म.औ.वि. महामंडळाने प्रस्तावित केलेनुसार मा. उच्चाधिकारी समितीने मान्यता दिली. | |
| ५. | **तळेगांव टप्पा क्र. ५ मौजे आंबी, ता. मावळ, जि. पुणे येथील गट नं. १३८ भूसंपादनातून वगळणेबाबत.** | तळेगांव टप्पा क्र. ५ मौजे आंबी, ता. मावळ, जि. पुणे येथील गट नं. १३८ भूसंपादनातून वगळणेबाबत भूधारकाने विनंती केली आहे. | मान्य |

| अ.क्र. | विषय | म.औ.वि. महामंडळाचे अभिप्राय | अध्यक्षांचे निर्देश |
|---|---|---|---|
| | | उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये वरील विषयासंबंधी सविस्तर चर्चा करणेत आली. अधिसूचित क्षेत्रामध्ये संबंधित खातेदाराची २० आंब्याची व १० नारळाची झाडे असून निवारा शेडही असल्याने भूसंपादनास खातेदाराची संमती प्राप्त होणार नाही. तसेच सदर क्षेत्र वगळण्यात आल्यास औद्योगिक क्षेत्राच्या सलगतेस कोणत्याही प्रकारची बाधा येणार नाही.<br>उपरोक्त बाबत मा. उच्चाधिकार समितीचे बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती म.औ.वि. महामंडळाने प्रस्तावित केलेनुसार तळेगांव टप्पा क्र. ५ मौजे आंबी, ता. मावळ, जि. पुणे येथील गट नं. १३८ चे १.६२.० हे.आर क्षेत्र भूसंपादनातून विनाअधिसूचित करणेस समितीने मान्यता दिली. | |
| ६. | **V.M. Electrical या नावे उद्योग सुरु असलेला अति. दिंडोरी औद्योगिक क्षेत्रातील मौजे तळेगाव येथील गट नं. ३०/२ चे १.०० हे.आर क्षेत्र वगळणेबाबत.** | सदर विषयावर उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करणेत आली.<br>अति. दिंडोरी मौजे तळेगांव येथील गट नं. ३०/२ चे १.०० हे.आर क्षेत्रास मऔवि अधिनियम, १९६१ अन्वये प्रकरण ६ दि. ०८/१२/२००७ रोजी अधिसूचित केले आहे. अतिरिक्त दिंडोरी औद्योगिक क्षेत्रासाठी अधिसूचित केलेल्या क्षेत्रास मऔवि अधिनियम, १९६१ अन्वये कलम ३२ (२) ची नोटीस गट नं. ३०/२ चे भूधारकाला दिली असता, उक्त नोटीशीवर भूसंपादनास हरकत (Objection) घेतली आहे. गट नं. ३०/२ चे १.०० हे.आर क्षेत्रावर V.M. Electrical या नावे सन २००४ पासून उद्योग सुरु आहे. म्हणजेच महामंडळाने अधिसूचित करणेपूर्वी पासुनच सदर उद्योग अस्तित्वात आहे. तसेच सदर क्षेत्र वगळल्याने औद्योगिक क्षेत्राच्या नियोजनात कोणतीही अडचण होणार नसल्याची बाब विचारार्थ घेण्यात आली. | मान्य |

| अ.क्र. | विषय | म.औ.वि. महामंडळाचे अभिप्राय | अध्यक्षांचे निर्देश |
|---|---|---|---|
| | | उपरोक्त सर्व बाबत मा. उच्चाधिकार समितीचे बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होवून म.औ.वि. महामंडळाने प्रस्तावित केलेनुसार चर्चेअंती मा. उच्चाधिकार समितीने अति. दिंडोरी मौजे तळेगांव येथील गट नं. ३०/२ चे १.०० हे.आर क्षेत्र वगळण्यास मान्यता दिली. | |
| ७. | **माणगांव व म्हसळा तालुक्यात औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेबाबत** | माणगांव जिल्ह्यातील मौज अळसुंदे, साई, मांजुर्णे, फल्सप, गोवेळे, रीळे, पाचोळे, नवशी व डोंगरोळी व म्हसळा तालुक्यातील मौजे चिखलप, कोंजारी, बेकऱ्याचा कोंड येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेबाबत चर्चा करण्यात आली.<br>सदर क्षेत्रासंबंधी प्रादेशिक अधिकारी यांचेकडून प्राथमिक अहवाल प्राप्त करुन भूनिवड समितीने स्थळपाहणी करावी.<br>स्थळपाहणीअंती औद्योगिक क्षेत्राची व्यवहार्यता तपासून पुढील उच्चाधिकार समितीपुढे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मा. उच्चाधिकार समितीने दिले. | मान्य |

*_*_*****_*_*